# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 13/11/2019**

**सभा सुचना क्रं. 17**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.35 मध्ये कोफराड तलावामध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रू. 14,67,986/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री.सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.35 मध्ये पढई गावापासुन ते राजेश तुस्कानो यांच्या घरापर्यंत असलेल्या नाल्यावर स्लॅब टाकणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रू. 13,44,523/-) या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सचिन देसाई सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती अंतर्गत आरोग्य विभागासाठी अतिरिक्त आरोग्य निरिक्षक (ठेका) कर्मचारी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 अंतर्गत नियम क्र. 4 व 15 अन्वये निर्मितीच्या जागी कचऱ्याचे वर्गीकरण तसेच निर्मितीच्या जागी कचऱ्यांवर प्रक्रिया करणे याविषयी वारंवार MPCB, CPCB व स्वच्छ भारत अभियान संचालनाकडून महानगरपालिकेला निर्देश देण्यांत आले आहेत. त्याकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कंत्राटी पध्दतीवर सार्वजनिक आरोग्य विभागाचे कामकाज करण्यासाठी अतिरीक्त 7 स्वच्छता निरीक्षक मंजूर ठेकेदारास कार्यादेश देणेकामी व त्यांचे वेतनापोटी येणाऱ्या खर्चास आजची मा.स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 4 | **साहित्य जल्लोष हा साहित्यिक, सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्रम साहित्य जल्लोष प्रतिष्ठान, विवा महाविदयालय आणि वसई-विरार शहर महानगरपालिका संयुक्त विद्यमाने करण्याबाबत.** | **ठराव :-** वरील विषयावर स्थायी समितीच्या सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार साहित्य जल्लोष या साहित्यीक, सांस्कृतिक व संगीतमय कार्यक्रम वसई-विरार शहर महानगरपालिका साहित्य जल्लोष प्रतिष्ठान आणि विवा महाविद्यायलय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. 17/11/2019 रोजी संपुर्ण दिवस सकाळी 9.30 ते रात्री 9.30 या वेळेत विवा महाविद्यालय विरार, पश्चिम येथे आयोजित करण्यांत यावा. त्यासाठी आजची स्थायी समितीची सभा सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच त्याकामी येणाऱ्या रक्कम रू. 15,00,000/- (अक्षरी रू. पंधरा लक्ष मात्र) इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी तसेच कार्यक्रमाची पुर्व तयारी करण्यासाठी गेट बॅनर छपाई करणे पुर्वी निमत्रंण पत्रिका छपाई करणे, लाकडी फ्रेमसह फ्लेक्स बॅनर छपाई करणे, लाकडी फ्रेमसह स्टेज बॅनर छपाई करणे, लाकडी फ्रेमसह गेट बॅनर छपाई करणे, वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे, हँण्डबिल छपाई करणे, विद्यार्थ्यांसाठी व कवींसाठी प्रशस्तीपत्र छपाई करणे इ. व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच कार्यक्रमासाठी येणारे उद्घाटक, प्रमुख पाहुणे, कवी, साहित्यीक व इतर मान्यवर यांचे स्वागत व सत्कार करण्यासाठी पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, आरतीचे सामान, पुस्तके इ. व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच कार्यक्रमासाठी येणारे उद्घाटक, प्रमुख, कवी साहित्यीक इतर मान्यवर यांचेसाठी अल्पोपहार, चहापान, कॉफी , सिलबंद पाण्याच्या बाटल्या, सिलबंद पाण्याचे जार, भोजन (शाकाहारी व मांसाहारी इ.) व्यवस्था करावी लागणार आहे. या व्यतिरीक्त स्टेज व मंडप व्यवस्था, ध्वनी योजना, (साऊंड सिस्टीम), प्लास्टिक खुर्च्या, व्ही.आय.पी. खुर्च्या, सोफे, गाद्यांची बैठक, झालरसह लाकडी टेबल, फोटोग्राफी, व्हिडीओ शुटींग (केबल टी.व्ही.वर थेट प्रक्षेपण) इ. व्यवस्था करावी लागणार आहे. वरीलपैकी कार्यक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य व इतर अनुषंगिक बाबी इ. साहित्य वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात सन 2019-20 या वित्तीय वर्षाकरीता मंजूर असलेल्या वार्षिक निविदा धारकांकडून खरेदी करण्यांत यावे. त्यासाठी आजची स्थायी समिती सभा प्रशासकीय मंजूरी देत आहे. त्याकामी होणारे त्यांचे देयके अदा करणेकामी आजची स्थायी समिती सभा वित्तीय मंजूरी देत आहे. कार्यक्रमासाठी सत्र क्र. 1 ते 4 मध्ये येणारे उद्घाटक, प्रमुख पाहुणे, कवी, साहित्यीक, इतर मान्यवर यांना साहित्य जल्लोष प्रतिष्ठानने केलेल्या मागणीनुसार एकूण मानधन 2,00,000/- रू. रोखीने द्यावे लागणार आहे. तसेच प्रमुख पाहुण्याचा निवास खर्च (10,000/-) व रांगोळी काढण्याचा खर्च (15,000/-) इ. व्यवस्था करावी लागणार आहे. असे एकत्रित मानधन पाहुण्यांचा निवास खर्च रांगोळी काढण्याचा खर्च मिळून 2,25,000/- अक्षरी (रू. दोन लक्ष पंचवीस हजार मात्र) इतका होणार आहे. सदरचा खर्च हा रोखीने |

| | | |
|---|---|---|
| | | करावा लागणार आहे. त्यासाठी ग्रंथालय कर्मचारी सौ. अरूणा देविदास तुजारे, सहा.ग्रंथपाल यांचे नांवे अग्रीम स्वरूपात 2,25,000/- अक्षरी (रू. दोन लक्ष पंचवीस हजार मात्र) इतकी रक्कम मुदतीत समायोजन करण्याच्या अटीवर देणेस आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. तसेच अमृतलता या कार्यक्रमाचे मानधन रक्कम रू. 3,50,000/- (अक्षरी तीन लक्ष पन्नास हजार रू. मात्र) धनादेशाद्वारे/आरटीजीएसद्वारे द्यावयाचे आहे. त्यासाठी आजची स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. वरीलप्रमाणे कार्यक्रमासाठी लागणारे सर्व साहित्य उपलब्ध करून घेण्यांस व त्यापोटी मंजूर निविदाधारकास होणारे देयक अदा करण्यास तसेच द्यावयाचे मानधन व इतर अनुषंगिक बाबींकरीता होणाऱ्या खर्चास आजची स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर  सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरार शहर महानगरपालिका**